महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्या अंतर्गत सर्व विभागीय मंडळांतील गट "अ" आणि गट "ब" (वर्ग-१ व वर्ग-२) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांची बदलीबाबत.....

महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: नियुक्ती-२०१९/प्र.क्र.६९(१)/गृनिभू

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
३ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ जुलै, २०१९

वाचा :- १) गृहनिर्माण विभागाचे पत्र, क्र. बदली २००८/प्रक्र.४/प्रशा ३, दिनांक ८.८.२०१८
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे परिपत्रक, क्र.प्राधि/बदली/धोरण/ २०११/४१९४/प्र.८, दिनांक ७ ऑक्टोबर, २०११.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ मधील तरतूदीनुसार, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची व त्या अंतर्गत सर्व प्रादेशिक मंडळांची (येथून पुढे यांचा उल्लेख "म्हाडा" असा करण्यात आला आहे.) स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच, सदर अधिनियमाच्या कलम १६४ ते १६९ अन्वये म्हाडावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार राज्य शासनास प्राप्त झालेले आहेत. म्हाडाचे अधिकारी-कर्मचारी हे शासकीय कर्मचारी ठरत नसले तरी ते लोकसेवक आहेत.

म्हाडाच्या गट "अ" संवर्गातील अधिकाऱ्यांची बदली सन २००८ पर्यंत शासन स्तरावरुन करण्यात येत होती. तद्नंतर बदली अधिनियम, २००५ व प्रचलित नियमानुसार तसेच अधिकारी/कर्मचारी यांची ३ वर्षांनी बदली करणे, एकाच मंडळावर किमान ६ वर्षे पुन्हा नियुक्ती न देणे आणि गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असलेल्या अधिकाऱ्यांना महत्वाच्या व संवेदनशिल पदावर न ठेवणे, या अटींच्या अधिन म्हाडाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या सुचना वाचा येथील गृहनिर्माण विभागाच्या दि.८.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना देण्यात आल्या आहेत. सदरहू सुचना पारीत केल्यानंतर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (प्राधिकरण) वाचा येथील त्यांच्या दि.७.१०.२०११ च्या परिपत्रकान्वये, म्हाडाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्यांचे धोरण ठरविले आहे.

राज्य शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या बदली अधिनियम, २००५ मधील तरतूदी विचारात घेऊन म्हाडाच्या अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचे धोरण प्राधिकरणाने त्यांच्या दि.७.१०.२०११ च्या परिपत्रकान्वये निश्चित केले आहे. सदरहू परिपत्रकातील तरतूदीनुसार आणि शासनाने वर नमूद दि.०८.०८.२००८ रोजीच्या पत्रातील मार्गदर्शक सूचनांनुसार म्हाडाकडून कार्यवाही होत नसल्याने विधानमंडळामध्ये संसदीय आयुधांद्वारे प्रश्न उपस्थित झाले आहेत. या बाबी विचारात घेऊन म्हाडाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे अधिकार शासन स्तरावर घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्या अंतर्गत सर्व विभागीय मंडळांतील (म्हाडा) गट “अ” आणि गट “ब” (वर्ग-१ व वर्ग-२) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या नियतकालिक तसेच मुदतपूर्व बदल्या करण्याचे अधिकार शासनास राहतील.

सदरचा निर्णय महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ च्या कलम १६४ अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारांन्वये घेण्यात आला आहे.

२. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७१९१२५६०९५००९ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bharose M U

Digitally signed by Bharose M U
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f3abf3ab8b16dfec487f18ce64d6b0ab8e38d8925d44d15f7dbd61babb4ae6df, serialNumber=8b015b0d7afaa0db7c0603c5c954e6816492dbb5f94ab286da7f224853a4eebf, cn=Bharose M U
Date: 2019.07.19 13:04:17 +05'30'

(मुं. उ. भरोसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०००३२
३) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
६) मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
७) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
८) सर्व मुख्य अधिकारी, मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ
९) सर्व उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०) निवडनस्ती, गृनिभू कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२